**नवी मुंबई महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**स्थायी समितीच्या शुक्रवार,दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ रोजी भरलेल्यास भेतील**
**मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०१ दि.२६ऑक्टोबर२०१८** | इतिवृत्त कायम करणे :- १) दिनांक २९/०९/२०१८ रोजीचे इतिवृत्त **कायम केले.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०२. दि.२६ऑक्टोबर२०१८** | नमुंमपा अग्निशमन विभागामार्फत विविध प्रकारच्या पार पाडण्यात आलेल्या वदर्याचा अहवाल मा. स्थायी समितीस देणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०६/१०/२०१८, चे पत्र जा. क्र.नमुंमपा/अग्नि/ वाशी/ ३८३५/२०१८. |
| **ठराव क्र.२२३. निर्णय :-** | **दफ्तरी दाखल.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०३ दि.२६ऑक्टोबर२०१८** | नेरुळ विभागातील एल.पी.बिकानेर स्वीटस ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यंत सायन-पनवेल महामार्गालगत फेन्सींग करुन परिसराचे सुशोभिकरण करणे, आयुक्तांचे दिनांक १५/१०/२०१८, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/श.अ./२१९१/२०१८. |
| **ठराव क्र.२२४.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. वेंकटेश्वरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंत्राटदारा बरोबर कार्यालयीन अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु.६२,८४,५६०/-इतक्या खर्चाचे कंत्राट मा.स्थायी समितीची संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४ दि.२६ऑक्टोबर२०१८** | नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम रकमेच्या मर्यादा वाढविणेबाबत, आयुक्तांचे दिनांक १०/१०/२०१८, चे पत्र जा. क्र.नमुंमपा/प्रशासन/ आस्था-१०/ घबांअ/ २३८४/२०१८. |
| **ठराव क्र.२२५.** | "उपरोक्त विषयासंदर्भात महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाच्या रकमेत सुधारणा करणेबाबत च्या प्रस्तावातील अट क्र.१ मध्ये अग्रिम मंजूर करतेवेळी अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा नियुक्ती नंतर प्रस्तावित किमान ५ वर्ष ऐवजी ३ वर्षाची सेवा झाली असली पाहिजे. अट क्र.२ मध्ये नमुद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सेवेमध्ये फक्त एकदा या ऐवजी दोनवेळा अग्रिम अनुज्ञेय करणेस, अट क्र.५ मध्ये नमुद केल्यानुसार पती, पत्नी दोघेही नवी मुंबई महानगरपालिका सेवेत असली तरीही त्यापैकी एकालाच या ऐवजी दोघांनाही घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय करणेस, तसेच यासाठी प्रस्तावित व्याजदर रु.१५ लक्ष पर्यतच्या अग्रिम रक्कमेवर ८.५०% व रु. ५० लक्ष पर्यतच्या अग्रिम रकमेवर १०.५०% ऐवजी पुर्वी प्रमाणेच म्हणजे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१०८८, दि.०८/०२/२०१० अन्वये निश्चित केल्याप्रमाणे ६.२५ टक्के, ६.७५ टक्के व ७.२५ टक्के असे ठरविण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबीसह घरबांधणी अग्रिम रकमेची मर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्तावास मंजुर करुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **सुधारणेसह मंजूर करुन महानगरपालिकेस शिफारस.** |

…२

| | |
|---|---|
| **विषय क्र.०५ दि.२६ऑक्टोबर२०१८** | परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना दयावयाच्या सानुग्रह अनुदान व लाभाबाबत, आयुक्तांचे दिनांक ११/१०/२०१८, चे पत्र जा. क्र.नमुंमपा/ प्रशासन/आस्था-१०/२३९२/२०१८. |
| **ठराव क्र.२२६.** | "उपरोक्त विषयासंदर्भात शासन निर्णयातील तरतूद नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांस लागू करणेस व त्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका सेवेत दि.०१/११/२००५ रोजी व त्यानंतर रुजू झालेल्या व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेचे सभासद असलेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचे १० वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना निधन झाल्यास त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अथवा त्याच्या कायदेशीर वारसास रु. १० लक्ष सानुग्रह अनुदान अधिक कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेली संचित रक्कम अदा करणेकरीता प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्याबाबींसह मंजुर करुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **मंजूर करुन महानगरपालिकेस शिफारस.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
महापालिका सचिव
नवी मुंबई महानगरपालिका

<u>तयार केले :-</u>
1) चेतन चं. कोळी (लि/ भां.) ---------
2) अशोक र.देसाई (मा.नो./लि.) -----------